*संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.*

*कार्यालयीन सूचना क्र. 30*

*क्र संगाबाअवि/2/एफ- 566/2018.* *दिनांक 06.08.2018.*

**विषय :- विद्यापीठाचे सर्व अधिकोष खाते कुलसचिव ऐवजी वित्त व लेखा अधिकारी या नावाने वर्ग करण्याबाबत.**

विद्यापीठाचे सर्व खाते, एफ.डी.आर. व टी.डी.आर. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (Registrar, Sant Gadge Baba Amravati University) या नावाने सुरु होते. महाराष्ट्र विद्यापीठे लेखा संहिता मधील क्र. १.५६ च्या तरतूदीचे अनुषंगाने विद्यापीठाचे सर्व बँकेचे खाते, एफ.डी.आर. व टी.डी.आर. वित्त व लेखा अधिकारी (Finance & Accounts Officer) यांचे पदनामे काढणे तसेच कुलसचिव यांचे पदनामाने अस्तित्वात असलेले सर्व बँकेचे खाते, एफ.डी.आर. व टी.डी.आर. वित्त व लेखा अधिकारी यांचे पदनामाने वर्ग करावयाचे आहे.

सदर प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने विषय क्र. ८२, दिनांक ०२.०६.२०१८ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. तसेच निर्णानुसार सर्व बँकेचे खाते, एफ.डी.आर. व टी.डी.आर. वित्त व लेखा अधिकारी यांचे पदनामाने वर्ग करण्यात आले आहे.

या करिता सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख व प्रशासकीय विभाग प्रमुख यांना विनंती की वरील प्रमाणे झालेल्या बदलाची नोंद घेण्यात यावी तसेच आपल्या विभागाशी संबंधित सर्व विभाग, संस्था व महाविद्यालयांना याबाबत आपल्या स्तरावर सूचित करण्यात यावे. तसेच विद्यापीठाच्या वेबसाईट वर, परीक्षा फॉर्म, बँक चालान व सर्व प्रकारच्या आवेदन पत्रावर आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी. या नंतर विद्यापीठाशी रकमेचे व्यवहार करतांना सर्व धनादेश, धनाकर्ष, बँक चालान ईत्यादि कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (Registrar, Sant Gadge Baba Amravati University) या नावाने न करता/ मागविता वित्त व लेखा अधिकारी (Finance & Accounts Officer) यांचे पदनामे करण्यासाठी सर्व विभाग, संस्था, महाविद्यालय व विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर त्वरित सूचित करावे.

आपला विश्र्वासु,

प्र. वित्त व लेखा अधिकारी,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

प्रत :

सर्व प्रशासकीय अधिकारी तथा शैक्षणिक विभाग प्रमुख,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.